



Anusandhanvallari
*Vol 2024, No.1*
*January 2024*
*ISSN 2229-3388*

# “दलित साहित्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये: अनुभवनिष्ठ अभिव्यक्तीचे साहित्यशास्त्रीय विश्लेषण”

**डॉ. भूषण प्रदीपकुमार देशमुख** (सी.एच.बी.)
मराठी विभाग
डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय गाडेगाव (तेल्हारा)

**Abstract (सारांश)** दलित साहित्य हा भारतीय साहित्याचा महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनशील प्रवाह आहे, जो पीडित, शोषित आणि वंचित घटकांच्या अनुभूतींना थेट, निर्भीडपणे अभिव्यक्त करतो. या संशोधन पेपरमध्ये दलित साहित्याचे स्वरूप, त्याची वैशिष्ट्ये, अभिव्यक्तीच्या पद्धती, भाषिक शैली, विषयवैविध्य तसेच सामाजिक प्रतिकाराची भूमिका यांचे साहित्यशास्त्रीय विश्लेषण केले आहे. अनुभवसिद्धता, वास्तवदर्शन, समानतेची तळमळ, प्रतिकाराची भूमिका आणि आत्मकथनात्मकता ही दलित साहित्याची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते. पेपरमध्ये निवडक दलित लेखकांच्या उदाहरणांसह दलित साहित्याच्या स्वरूप आणि वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास सादर केला आहे.

**Keywords -:** दलित साहित्य**,** आत्मशोध, नकार, विद्रोह, समूहमन, बांधिलकी, विज्ञाननिष्ठा, आंबेडकरी साहित्यप्रवाह**,** अस्मितावादी

## प्रस्तावना (Introduction)

भारतीय समाजरचनेतील जात-असमानता, शोषण आणि दमन यांचा दीर्घ सामाजिक-ऐतिहासिक प्रवास दलित जीवनाला छेदणारा आहे. या अनुभवांना पहिल्यांदा निर्भीडपणे, थेटपणे साहित्यिक अभिव्यक्ती मिळाली ती दलित साहित्याच्या माध्यमातून. पारंपरिक साहित्य जेथे प्रतीक, अलंकार, रूमानीकरण किंवा कल्पनाविलासातून पुढे सरकते, तेथे दलित साहित्य प्रत्यक्ष जीवनवास्तवावर आधारित, अनुभवनिष्ठ आणि संघर्षप्रधान आहे. दलितांच्या दैनंदिन आयुष्यातील वेदना, आर्थिक दारिद्र्य, सामाजिक बहिष्कार, मानवी प्रतिष्ठेची हानी आणि समानतेची आस ही दलित साहित्याची मुख्य गाभा-तत्त्वे आहेत.

या संशोधन पेपरचा उद्देश दलित साहित्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये साहित्यशास्त्रीय दृष्टीकोनातून स्पष्ट करणे हा आहे.

**◈ संशोधनाची उद्दिष्टे (Objectives)**

1. दलित साहित्याचे स्वरूप सविस्तरपणे स्पष्ट करणे.
2. दलित साहित्याची मुख्य वैशिष्ट्ये ओळखणे आणि त्यांचे विश्लेषण करणे.
3. अनुभवनिष्ठता आणि वास्तवदर्शनाची भूमिका स्पष्ट करणे.
4. निवडक दलित लेखकांच्या साहित्यकृतींचा संदर्भ घेऊन मिळालेल्या वैशिष्ट्यांची पडताळणी करणे.
5. दलित साहित्याचे साहित्यशास्त्रीय महत्त्व अधोरेखित करणे.

**◈ गृहीतके (Hypotheses)**

1. दलित साहित्य हे अनुभवनिष्ठ, वास्तवाधिष्ठित आणि प्रत्यक्ष जीवनावरील आधारित साहित्य आहे.
2. दलित साहित्याची वैशिष्ट्ये ही दलितांच्या संघर्ष, प्रतिकार, वेदना आणि आत्मसन्मानाच्या आकांक्षेतून घडलेली आहेत.
3. दलित साहित्य पारंपरिक साहित्यशैलींपेक्षा प्रामुख्याने प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असल्याने त्याचे स्वरूप अधिक प्रत्यक्ष, तीव्र आणि वास्तववादी आहे.

**◈ संशोधन पद्धत (Methodology)**

* गुणात्मक (Qualitative) संशोधन पद्धती
* ग्रंथसमीक्षात्मक (Textual Analysis) पद्धत
* दलित साहित्यकारांच्या आत्मकथा, कथा, कविता आणि निबंधांचा संदर्भ
* साहित्यशास्त्रीय तत्त्वांवर आधारित विश्लेषण

**◈ मुख्य विवेचन (Discussion)**

**दलित साहित्य स्वरूप आणि वैशिष्टे**

दलित साहित्य हे आधुनिक साहित्य आहे. स्वातंत्र्योतर काळातल्या दलित चळवळीच्या झंझावातामुळे हे साहित्य जसे प्रभावित झाले आहे. तसे आंबेडकरी विचाराच्या प्रेरणेमुळे ह्या साहित्याचा उदय झाला आहे. दलित चळवळीचा मुख्य उद्देश माणसाला 'माणूस' म्हणून जगवले

पाहिजे. दलितांचे शोषणापासून मुक्ति करण्यासाठी साऱ्या शोषितांचा हुंकार हा नकार, प्रक्षोभ, बंड आणि विद्रोहाच्या माध्यमातून दलित साहित्यातून व्यक्त होतो.

**१. आत्मशोध :-**

दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्याच्या विविध चळवळीने आत्मसन्मानाने जीवन जगण्याची दिशा दिली. दलित साहित्य हे चळवळीचे साहित्य आहे. या चळवळीचा मुख्य उद्देश माणसाला 'माणूस' म्हणून वागणूक दिली गेली पाहिजे हा होता. वर्षानुवर्ष माणसाला माणूस पण नाकारले गेले. विषम समाज व्यवस्थेमुळे दलितांना अतिशय हीन, पशू सम वागणूक दिली गेली. जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे सर्व मार्ग सवर्णांनी बंद केले होते. अशा दलितांना आत्मसन्मानाने जगण्याची दिशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली. शिक्षणाचे महत्व दलितांना पटवून दिले. शिक्षणाच्या संस्काराने त्यांच्या विचारांना मार्ग दाखविला. म्हणूनच आत्मसन्मानाची जान आणि भान दलित साहित्यातून प्रकर्षाने व्यक्त होते. कारण दलित मुक्तिच्या लढ्यातील मुख्य उद्देश माणसाचा आत्म सन्मान म्हणजेच माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा देणे हाच आहे.

२ नकार :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते दलित वर्गामध्ये आत्मभान निर्माण झाले पाहिजे आणि आत्म सन्मानाच्या मार्गात ज्या ज्या गोष्टी अडसर ठरतात त्या सर्वांना नकार दिला पाहिजे हा भाव आहे. धर्माधिष्ठित रूढी परंपरेला दलित वर्गाने नकार दिला. अस्पृश्यता हा दलितांच्या देहावरील कलंक आहे तो वेळ पडली तर दलित वर्गाने आपल्या रक्ताने आपणच पुसून काढला पाहिजे. या बाबासाहेबांच्या विचाराने त्यांच्या आत्मभान निर्माण झाला. शोषण, अंधश्रद्धा, गुलामगिरी, अन्याय, विषमता इत्यादींना नकार देण्याची भूमिका दलित साहित्य घेते. समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, विषमतेला नकार दिला पाहिजे. समाजात खोलवर रुजलेली अन्यायकारक व्यवस्था नाकारणे, हे कोणत्याही विद्रोही चळवळीचे सूत्र असते. म्हणून अन्यायाला नकार दिला पाहिजे असे दलित साहित्य मानते.

३ विद्रोह :-

भारतीय चातुर्वर्ण्यधिष्ठित समाजव्यवस्थेविरुद्ध दलित साहित्याने विद्रोही भूमिका स्वीकारली आहे. या साहित्यात प्रकट होणारे नकार व विद्रोह हे आत्म शोधाचीच प्रकट रुपे आहेत. दलित साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह हा मुख्यातः धर्म, रूढी, परंपरा, संस्कृती इत्यादींना पवित्र व श्रेष्ठ

Anusandhanvallari
*Vol 2024, No.1*
*January 2024*
*ISSN 2229-3388*

मानून त्या आधारे दलितांना वर्षानुवर्ष गुलाम ठेवू पाहणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध हा विरोध येतो. हा विद्रोह या व्यवस्थेवर आघात करतो. दलित साहित्यातील विद्रोह विशिष्ट व्यक्तिविरुद्ध किंवा विशिष्ट जमातीविरुद्ध नाही तर तो विषमतेविरूद्ध आहे. हा विद्रोह प्रस्थापित व्यवस्थेचा प्रतिशोध नसून एका समान पातळीवरील व्यवस्थेची नितांत गरज प्रतिपादण्याच्या हेतूने आलेला आहे.

४ समूहमन :-

दलित साहित्यामध्ये समूहमनाचे दर्शन होते. कोणतीही कलाकृती ही एका व्यक्तीची निर्मिती असते. त्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारा अनुभव हा एका व्यक्तीचा नसून त्या समाजातील सर्वांचा अनुभव असतो. दलित साहित्यात मात्र निर्मितीच्या पातळीवर एका व्यक्तीची असणारी अनुभूति एकाच वेळी व्यक्तिनिष्ठ ही असते व समूहनिष्ठ किवा समाजनिष्ठ असते. कारण दलित समाजात अन्याय, शोषण, विषमता, दारिद्र्य याने पीडला गेला आहे. धर्म, रूढी, परंपरा माथी टाकलेले बहिष्कृत जगने हा सर्व समाजाचा अनुभवाचा भाग आहे. म्हणून दलित साहित्यातून येणारे साहित्यिक जेव्हा आपले अनुभव व्यक्त करतो तेव्हा तो अनुभव त्या साहित्यिकाप्रमाणेच त्याच्या समुहाचेही अनुभव असतात. दलित आत्मकथनाचा विचार केला तर तो 'मी' चा अनुभव 'आम्ही' चाही बनतो.

५ बांधिलकी :-

दलित साहित्यिक हा सामाजिक बांधिलकी मानणारा लेखक आहे. तो आपल्या समाजाचा पक्षकार होऊन लेखन करत असतो. त्याची बांधिलकी जबाबदारीच्या भावनेतून निर्माण झालेली असते. बांधिलकी या शब्दाचा अर्थ कोणत्या तरी एका भूमिकेशी बांधील राहणे असा घेतला जातो. दलित लेखकाची जन्म नाळ ह्या वर्गाच्या वेदनेशी जखडलेली आहे. दलित साहित्यातील बांधिलकी त्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनमूल्यांच्या संदर्भात आहे. धर्माधिष्ठित सामाजिक विषमता, या विषमतेतून वाट्याला आलेले पशुपेक्षाही हीन, भयावह

६ विज्ञाननिष्ठा :-

दलित साहित्य ईश्वरकल्पनेला नकार देते. आंबेडकरवाद हा मानवी मूल्यावर आधारलेला तो भक्कम अशा बुद्धिवादावर उभा आहे. आणि बुद्धतत्वज्ञांनाची त्याची मूल बैठक असल्याने विज्ञान हे त्यांचे एक अंग आहे. भगवान बुद्ध प्रमाणे आंबेडकरवादानेही ईश्वर, आत्मा यांना नाकारले. देवधर्माला, धर्मशास्त्राला त्याच्या सिद्धान्तयास नाकारले आहे. प्रा. रावसाहेब कसबे

म्हणतात, "प्रज्ञा, शील, करुणा व मैत्रीची सांगड म्हणजे आंबेडकरवाद अनित्य, अनात्म, अनिश्वरवाद आणि विज्ञानवाद म्हणजे आंबेडकरवाद बुद्धीप्रमाण्य, विवेक, गती, तर्क आणि बुद्धिवादाचा स्वीकार म्हणजे आंबेडकरवाद" यामुळे आंबेडकरी प्रेरणेतून दलित साहित्याचा विज्ञाननिष्ठा हा एक गुणधर्म आहे.

निष्कर्ष (Conclusion)

या संशोधनातून स्पष्ट होते की दलित साहित्य हे केवळ साहित्य नसून भारतीय समाजाच्या प्रत्यक्ष इतिहासाचे, वेदनांचे आणि संघर्षांचे जिवंत दस्तऐवज आहे. याचे स्वरूप अनुभवाधिष्ठित, वास्तववादी, प्रतिकारवादी आणि परिवर्तनवादी आहे. त्याची वैशिष्ट्ये—अनुभवनिष्ठता, प्रतिकार, सामूहिक चेतना, भाषेची निर्भीडता, सामाजिक वास्तव आणि परिवर्तनाची आकांक्षा—ही दलित साहित्याला स्वतंत्र, सबळ आणि प्रभावी बनवतात.

दलित साहित्य भारतीय साहित्याला वेगळी दिशा देत मानवी मूल्यांवर आधारलेले परिवर्तनवादी प्रवाह निर्माण करते.

**संदर्भग्रंथ**

१. डॉ. लिंबाळे शरणकुमार - दलित साहित्य आणि सौदर्य (समीक्षा)
२. प्रा. जाधव रा. ग. साहित्यः बदलते परिप्रेक्ष्य
३. श्री. खंडेराव हरीश आंबेडकरवादी साहित्यः दृष्टिकोण आणि दायित्व
४. फडके भालचंद्र दलित साहित्य वेदना आणि विद्रोह.
५. जाधव रा. ग. निळी क्षितिजे.